# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट** दिनांक ०८/१०/२०२२

## चाकण पोलीस स्टेशन तपास पथकाकडुन मेदनकरवाडी येथील पतीने सुपारी देवुन केलेल्या पत्नीच्या खुनाच्या गुन्हयाची उकल, पाच आरोपी जेरबंद

दिनांक ०१/०९/२०२२ खबर देणार गोरक्ष बबन देशमुख वय ३५ वर्षे, व्यवसाय- चपाती सप्लाय, रा. बोरजाई नगर, मेदनकरवाडी ता. खेड जि. पुणे याने रोजी चाकण पोलीस स्टेशन येथे खबर दिली की, माझी पत्नी आशा गोरक्ष देशमुख, वय ३० वर्षे हि दिनांक २९/०८/२०२२ रोजी रात्री ०२/०० वाजले पासुन बेपत्ता आहे अशी खबर दिली सदर खबरी वरून चाकण पोलीस स्टेशन मानव मिसींग रजिस्टर नंबर २५०/२०२२ प्रमाणे दाखल करण्यात आलेली होती, सदर मानव मिसींगची प्राथमीक चौकशी सपोफौ/ सुरेश गोरडे हे करीत होते. दरम्यान आशा गोरक्ष देशमुख हिचा पती गोरक्ष देशमुख हा पोलीस स्टेशनला चौकशी दरम्यान वांरवार वेगवेळी हकीगत सांगुन तक्रार करीत होता. सदर मिसींग व्यक्ती बाबत संशय बळावल्याने सदर मिसींगची चौकशी डि. बी. पथकाचे सपोनि विक्रम गायकवाड यांचेकडे देवुन सदर मिसींग बाबत तपास पथकाचे सपोनि प्रसंन्न ज-हाड, सपोनि श्री. विक्रम गायकवाड व तपास पथकास सखोल चौकशी करण्याचे आदेश वपोनि श्री. वैभव शिंगारे यांनी दिले होते.

दिनांक ०६/१०/२०२२ रोजी तपास पथकाचे सपोनि प्रसंन्न ज-हाड, सपोनि श्री. विक्रम गायकवाड, पोलीस नाईक हनुंमत कांबळे , पोलीस अमंलदार प्रदीप राळे यांनी सदर मिसींगचे खबर देणार गोरक्ष बबन देशमुख यास ताब्यात घेवुन त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने सुरूवातीला उडवा उडवीची उत्तरे देवुन वारंवार घटनेची व घटनास्थळाची विसंगत माहिती देत असल्याने गोरक्ष देशमुख याचेवर तपासपथकाचा अधिकचा संशय बळावला त्यामुळे त्याचेकडे अधिक सखोल विचारपुस केली असता त्याने त्याची पत्नी अशा हिचा बाहेर पुरषाशी अनैतीक संबंध असल्याचे तिचे चारीत्रवर संशय घेवुन त्या कारणावरून तीला जिवे ठार मारण्याचे ठरविले. त्याकरीता त्याने त्याचे ओळखीचा रोशन गजानन भगत उर्फ रॉकी यास विश्वासात घेवुन माझी बायको आशा ही चुकीची वागत असुन असे चुकीची माहिती सांगुन तीला ठार मारण्यासाठी त्याबदल्यात त्याला एक लाख रूपये सुपारी देण्याचे ठरविले. रॉकी यांने त्यासाठी चाकण येथील त्याचे साथीदार देवा व मुंढे असे दोन साथीदारांना सोबत घेवुन दिनांक २८/०८/२०२२ रोजी सायंकाळी आळंदी घाटाचे जंगलामध्ये अधिच खडडा घेवुन गोरख याने साथिदारांचे मदतीने दिनांक २९/०८/२०२२ रोजी रात्री ०२/०० वा. चे सुमारास पत्नी आशा हिचा राहते घरात दोरीने गळा आवळुन तीचे तोंडावर उशी दाबुन तीस ठार मारून तीचे प्रेत गोरक्ष व रॉकी यांनी गोरक्ष याचेकडील स्कुटीवर ठेवुन घेवुन जावुन आळंदी घाटात आधिच खणुन ठेवलेल्या खडडयामध्ये पुरले आहे. अशी गंभीर व धक्कादायक माहिती सांगीतली.

आरोपीने सांगीतले हकीगत ही गंभीर स्वरूपाची असल्याने वपोनि वैभव शिंगारे यांनी तात्काळ सदर प्रकार मा. पोलीस आयुक्त सो, अंकुश शिंदे, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे , मा. पोलीस उप आयुक्त सो मंचक इप्पर, मा. सहा. पोलीस आयुक्त सो, प्रेरणा कट्टे यांना कळविला, त्यानंतर वरिष्ठ अधिकारी तात्काळ घटनास्थळावर आले त्यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला. तपासा अंती असे निष्पंन्न झाले की, संशयीत आरोपी गोरक्ष देशमुख याने रोशन गजानन भगत व इतर साथीदार यास एक लाख रूपयांची सुपारी देवुन त्यांचे बरोबर संगनमत करून नियोजनबध कट रचुन दि.२९/०८/२०२२ रोजी रात्री ०२/०० वा. चे सुमारास त्याचे राहते घरात पत्नी आशा गोरक्ष देशमुख हिचा दोरीने गळा आवळुन तीस ठार मारून तीचे प्रेत चादरीमध्ये बांधुन गोरक्ष देशमुख व रोशन भगत यांनी स्कुटीवर ठेवुन ते आळंदी घाटात

नेवुन पुर्वी खाणुन ठेवलेल्या खडडयामध्ये पुरले. दरम्यान गोरक्ष देशमुख यास मिसींगचे चौकशीसाठी वारंवार पोलीस स्टेशनला बोलावल्यावर त्याचेवर पोलीसांना संशय आल्याचे लक्षात आल्याने गोरक्ष देशमुख याने त्याचे वडील बबन शिवलिंग देशमुख यांना गावावरून बोलावुन घेतले. व त्यांचे मदतीने सदरचे प्रेत पुरलेल्या ठिकाणीच जाळायचे ठरविले. दिनांक ०१/१०/२०२२ रोजी गोरक्ष व वडील बबन यांनी आशा हिचे प्रेत उकरून त्याच खडडयात ठेवुन जंगलातील लाकडे त्यावर टाकुन जाळले परंतु सदरचे प्रेत अर्धवट जळाले म्हणुन सदरचे अर्धवट जळालेले प्रेत एका पोत्यात भरले व वडील बबन यांनी जवळच केळगांव हददीत असलेल्या डोंगरातील पाझर तलावात फेकुन दिले, दोन्ही आरोपीचे सांगणे खडयातुन मयत आशा हिचे प्रेताचे अर्धवट जळालेले अवशेष मिळालेले असुन पाझर तलावातुन अर्धवट जळालेले प्रेत पोलीसांना मिळाले आहे.

सदर घटने बाबत सपोनि विक्रम गायकवाड यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवुन चाकण पोलीस स्टेशन येथे गुरनं १५८१/२०२२ भादवि कलम ३०२, २०१, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आरोपी गोरक्ष देशमुख याचे सोबतचे सुपारी घेतलेले इतर आरोपी हे गुन्हा केल्यानंतर पैसे घेवुन पळुन गेले होते. चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने एक आरोपी म्हसवड सातारा येथुन, एक आरोपी बिड जिल्हयातुन सापळा लावुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयात आरोपी नामे १) गोरक्ष बबन देशमुख, वय ३५ वर्षे, रा. मेदनकरवाडी ता. खेड जि. पुणे, २) रोशन गजानन भगत उर्फ रॉकी वय २० वर्षे रा. मेदनकरवाडा मुळ रा. रूई ता. मानोरा जि. वाशीम, ३) देवानंद गजानन मनवर वय २४ रा. वाडा ता. मानोरा जि. वाशीम, ४) बबन शिवलींग देशमुख वय ६२ वर्षे रा. पडेगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर, ५) किशोर दत्तात्रय मुंढे वय २७ वर्षे रा. कान्हेरवाडी ता. परळी जि. बिड यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांची दि. १४/१०/२०२२ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. सदर आरोपींनी गुन्हयाची कबुली दिलेली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास हा अनिल देवडे पोनि (गुन्हे) हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. मंचक इप्पर, सहा. पोलीस आयुक्त, प्रेरणा कट्टे यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.वैभव शिंगारे तसेच पोलीस निरीक्षक(गुन्हे) अनिल देवडे, तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रसंन्न जराड, विक्रम गायकवाड, सपोफौ सुरेश हिंगे, पो हवा राजु जाधव, संदिप सोनवणे, पोना हनुमंत कांबळे, निखिल शेटे, सुदर्शन बर्डे, भैरोबा यादव, मपोना भाग्यश्री जमदाडे, पोकॉ / नितीन गुंजाळ, निखील वर्पे, अशोक दिवटे, प्रदिप राळे, सुनिल भागवत, चेतन गायकर, उध्दव गर्जे यांनी केलेली आहे.

**(मंचक इप्पर )**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड**